# गायन हा संसार मानणारे गानू मास्तर

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - दैनिक नवशक्ती, मुंबई - ०३ मार्च १९६८)

गुरुवर्य गानूंना माझ्या पिढीतले बरेच लोक 'मास्तर' म्हणून ओळखतात. 'तय्यार' दिलरूबावादक प्रल्हाद गानू ही त्यांची ओळख आता त्यांचा जुना फोटो, कपाटातला गवसणीतला दिलरूबा व समकालीनांच्या आठवणी यांच्याच आधारे पटवून घ्यावी लागते. कारण गाणे नीट शिकण्याच्या इच्छेने त्यांनी 'संगीत दिलरूबा संन्यास' घेतल्याला आज बरीच वर्ष लोटली. आज मास्तरांना सर्व संगीतप्रेमी ओळखतात ते आदर्श शिक्षक म्हणून व संगीताचे - विशिष्ट गायकीचे नव्हे - भक्त म्हणून. आपली विशिष्ट गायकी तीच श्रेष्ठ मानून इतरांकडे वरून पाहण्याचा प्रकार हा महाराष्ट्रात सार्वत्रिक आहे. अशा परिस्थितीत ग्वाल्हेर गायकी मनःपूर्वक हवीहवीशी वाटणाऱ्या, आग्रा गायकी कडवेपणे जोपासणाऱ्या, जयपुर गायकीचे भक्तिभावाने श्रवण करणाऱ्या व किराण्यापासून कुमार गंधर्वापर्यंत सर्व गाणी कानात प्रेमपूर्वक साठविणाऱ्या व्यक्तीची अपूर्वाई करावी हे साहजिकच होय.

मास्तरांनी देवरुख ते मुंबई हे शिक्षणार्थ केलेले देशांतर कोकणस्थांना काही नवीन नाही. बाळाजी विश्वनाथापासून ते महर्षी कर्व्यांपर्यंतचीही परंपरा हीच आहे. डोळ्यापुढे शिक्षण दिसू लागले की अस्वस्थ व्हावे व मुंबई-पुण्याचा रस्ता शोधावा हा जणू नियमच होता. पण मास्तरांच्या बाबतीत थोडा वेगळा प्रकार असा की मास्तरांचे ध्येय त्यांना फक्त ऐकू येई! कारण मास्तरांना लहानपणापासूनच दिसत नव्हते.

मास्तरांचा जन्म वाशीला दासनवमीस १९०८ मध्ये झाला. अंधत्व आणि मोठे कुटुंब! यामुळे घरी वाशीला वा आपल्या मामांच्याकडे गोंद्यास मास्तर होते. त्या काळची आठवण मास्तर सांगतात ती एवढीच की सर्व मुले त्यांना नेहमी खेळताना 'भोज्या' करीत! पण एक दिवस शेजाऱ्यांनी केसरीतून मुंबईच्या अंधशाळेची माहिती वाचून दाखवली आणि मास्तरांनी खुणगाठ बांधली की आता अंधशाळेच्या 'भोज्यास' स्पर्श करेपर्यंत आपला खेळ थांबवणे नाही! वडिलांजवळ त्यांनी हट्ट धरला. एवढ्या लहान वयात घरापासून दूर कसे ठेवावयाचे याचा वडिलांना अर्थातच प्रश्न पडला. पण मनात आणलं की मास्तर केल्याशिवाय सोडीत नाहीत हा काही त्यांचा आजचा गुण नाही. आपण न पोचविल्यास मुलगा सदरा घालून सडकेची वाट धरील अशी खात्री पटताच वडिलांनी निमुटपणे ताडदेवच्या अंधशाळेत १९१९ मध्ये मास्तरांना आणून सोडलं.

तिथे तीन बोटांनी दिलरूबा वाजविण्याचे अभिनव तंत्र सांगणारा एक मुसलमान शिक्षक व प्रो. बा. र. देवधर यांच्या सांगीतिक वर्तुळात मास्तर खेचले गेले. अंधशाळेतून प्रो. देवधरांनी पुढे त्यांना आपल्या विद्यालयात दिलरूबा शिक्षक म्हणून आणून ठेवले. इथे दिलरूबा शिकविणे व पं. नारायणराव व्यास व पं. विनायकबुवा पटवर्धन इ.च्या बरोबर साथी करणे असा तेव्हा मास्तरांचा कार्यक्रम होता.

१९३० साली मास्तरांचे लग्न झाले. पं. विष्णु दिगंबरांचे शिष्य असलेल्या पं. शंकरराव बोडस व पं. लक्ष्मणराव बोडस यांच्या बहिणीशी मास्तरांचे लग्न झाले. ती. सौ. सुशीलाबाईंची आठवण अशी की मास्तरांनी त्यांना आवाज ऐकूनच पसंत केले. मास्तर विनोदाने म्हणतात की, पहिल्यापासूनच 'दृश्य' भाग त्यांच्या बाबतीत कमी महत्त्वाचा होता, त्याचेच हेही प्रत्यंतर होय.

दासनवमीला जन्मलेले मास्तर लग्नानंतर एका वेगळ्या अर्थाने सावधान झाले. आपण दिलरूबा वाजवतो पण हे काही खरे नव्हे असे त्यांना वाटू लागले. जुने सारंगीवादक कै. बाबुराव कुमठेकर यांच्याकडे विशेषतः गजकाम शिकण्यास आरंभ केला. पण तरीही आपण गाणे शिकल्याशिवाय आपला तरणोपाय नाही हे त्यांच्या मनात ठसले होतेच. गांधर्व महाविद्यालय परंपरेतील एक ज्येष्ठ

शिष्य श्री. रामभाऊ अष्टेकर यांनी त्यांना सल्ला दिला की, तुम्ही विलायत हुसेन यांच्याकडे शिका. आता मास्तरांच्या पुढे प्रश्न पडला की, खाँसाहबांना गाठावयाचे कसे! पण इच्छा तीव्र असल्यानेही मार्ग लवकरच सापडला. एक दिवस मुरारबागेत विलायत हुसेन खाँसाहेबांचे गायन होते. तिकडे गाणे ऐकण्यासाठी गेले असता खाँसाहेबांचा पेटीवाला आला नसल्याने ते फिकरीत असल्याचे मास्तरांच्या लक्षात आले. मास्तरांनी लगेच पेटीवर बसण्याची तयारी दाखवली. साथ आटोपशीर पण व्यवस्थित झाल्याने अनोळखीची ओळख तरी झाली.

नंतर प्रश्न उद्भवला तो मुद्याचा! शिक्षण घेण्याविषयी मास्तरांना कोणीतरी सांगितले की, खाँसाहेब लॅमिंग्टन रोडच्या विशिष्ट बस स्टॉपवर शिकवणी आटपून उभे असतात. खाँसाहेब तेव्हा तांबूस रंगाचा लांब कोटही घालत. मास्तरांनी एक दिवस कोटाच्या दिशेने वाटचाल करून खाँसाहेबांना गाठले व "मला शिकवाल काय?" असे सरळसरळ विचारले. खाँसाहेबांनी सांगितले संध्याकाळी घरी या. संध्याकाळी घरी गेल्यावर "सध्या तुम्ही खादीम हुसेन यांच्याकडे शिका" असे त्यांनी मास्तरांना सांगितले. रीतसर गंडाबंधन वगैरे करून खादीम हुसेन यांच्याकडे शिकण्याचे ठरले.

पण मध्यंतरी मास्तर आपले अंध परममित्र श्री. दत्तारामजी गोकर्ण यांच्याबरोबर असता मोटार अपघातात सापडले. या अपघातातून उठले ते आपल्याला अधिक नजर आल्याचे सांगतच. त्यामुळे अर्थातच खादीम हुसेन यांच्याकडून गायनातली नजर मिळवायला लागण्याच्या कार्यक्रमास विलंब लागला! कारण गंडाबंधनासाठी जमवलेले पैसे औषधोपचारात खर्च झालेले होते. पण नंतर लवकरच १९३३ ते १९३७ पर्यंत त्यांना खाँसाहेबांची तालीम मिळाली. या अवधीत मास्तरांना अनेक बिऱ्हाडे बदलावी लागली. याचे कारण मास्तरांकडे मुसलमानांची ये-जा असे! गवई आणि त्यात ही भर - त्यामुळे घरमालक भाड्याच्या पावतीबरोबरच नोटीसही देत. १९३९ पासून मात्र मास्तरांचा गृहस्थाश्रम नाना चौकातल्या ‘इस्ट ॲन्ड वेस्ट विला’मध्ये स्थिरावला तो अगदी आजतागायत.

१९३७ ते १९४४ पर्यंत मास्तरांचे शिक्षण थांबले होते. शिक्षणाची इच्छा काही थंडावली नव्हती, पण धन्नाजीचा नन्नाचा पाढा होता ना! एकदा वैद्यराज नांदणीकरांच्याकडे मास्तरांच्या सांगीतिक तब्येतीचा विषय निघाला असता खाँसाहेब विलायत हुसेन यांच्याकडे शिकायला न मिळाल्याबद्दल मास्तरांनी खंत व्यक्त करताच वैद्यराज म्हणाले, "त्यात काय, मी सांगतो खाँसाहेबांना" "पण मी खादीम हुसेनखाँचा गंडाबंद शागीर्द आहे", मास्तरांनी गायनक्षेत्रातली रूढीची अडचण उल्लेखून म्हटले. पण वैद्यराजांच्याजवळ तोडगेही खूप. त्यांनी सांगितले "अरे त्यात काय झाले! सुशीलाबाईंना गाणे शिकवायला सांगा खाँसाहेबांना, तुम्ही सहवास करा". हा रामबाण तोडगा वैद्यराजांच्या इतर रामबाण औषधासारखाच गुणकारी ठरला. खाँसाहेब सुशीलाबाईंना तालीम देण्यासाठी १९४४ पासून येऊ लागले. अर्थात त्यांच्या द्वारा मास्तर शिकत असाच प्रकार असे. खाँसाहेबांनी शिकविण्यात कधीच काटकसर केली नाही. गंडाबंधनाच्याच दिवशी 'गारा कानडा' शिकवा असे सुचवणाऱ्या मास्तरांचा आवाका व झेप त्यांच्या लक्षात आल्याशिवाय राहिली नाही. शिकणारा वा शिकवणारा यात अधिक उत्सुक कोण अशी शंका वाटावी इतके दोघे दंग असत.

या संदर्भात एक गोष्ट सांगण्यासारखी आहे. आठवड्यांत तीन दिवस व महिन्यास ४० रु. अशी खाँसाहेबांची फी ठरली होती. पण शिकवणी सुरू झाल्यावर थोड्याच दिवसात मास्तरांनी खाँसाहेबांना सांगितले, "खाँसाहेब, आता दररोज शिकायला यावे अशी इच्छा आहे पण फी मात्र ५० रु. देईन". खाँसाहेबांनी एकदा चष्म्यातून मास्तरांकडे बघितले व 'हाँ' केले. १९५३ पर्यंत या तऱ्हेने मास्तर अशी अप्रत्यक्ष तालीम घेत होते.

१९५३ नंतर परिणतप्रज्ञ मास्तरांनी पैशाच्या तंगीमुळे तालीम बंद करण्याचा निर्णय घेतला. खाँसाहेब अर्थात तसेच येत राहायला तयार होते पण मास्तरांना ते बरे वाटले नाही. इथून पुढे माझ्या मते मास्तरांचा स्वतंत्र निर्मितीचा काळ आला. लेखात उल्लेखलेले श्री. दत्ताराम गोकर्ण हे त्यांच्याकडे तबला वाजवायला येत असत. यांचा हिंदी व ब्रज भाषेचा उत्तम अभ्यास असून

रचनाकौशल्यही चांगल्या दर्जाचे आहे. त्यांचा शब्दभाग व मास्तरांचा स्वरभाग अशा संयोगाने मास्तरांनी सुमारे १००-१२५ चीजा रचल्या आहेत. यांतल्या कोमल ऋषभ आसावरी, श्री, गौड मल्हार इ. तील चीजा फारच सुंदर आहेत. मास्तरांनी देस व मांड असे दोन राग वाजवलेली त्यांची एकुलती एक ध्वनिमुद्रिका आता मिळत नसल्याने या चीजा हेच मास्तरांचे पुढच्या पिढ्यांना देणे म्हणायला हवे.

मास्तरांची बाहेर जाऊन शिकवण्याची उमेद त्यांच्या वाढत्या दृष्टिमांद्यामुळे जरा खचली आहे. पण त्यांच्यासमोर बसून शिकणाऱ्यास अजून ते दोन्ही हातांनी देण्यास तयार आहेत. अतिशय पध्दतशीर, पचेल अशा घासाने शिकवणारे पण त्याचबरोबर संगीताच्या मूळ तत्वाबाबत तडजोड न करणारे व करून न देणारे मास्तर हे 'इलमदार' विद्वान असूनही आदर्श शिक्षक आहेत. त्यांच्याकडे शिकून तयार झालेल्यात श्री. नारायण बोडस यांचा उल्लेख जरूर केला पाहिजे. मला मास्तरांचे लाभलेले तीन-चार वर्षांचे मार्गदर्शन हे इतके भरीव व नेमके आहे की, मास्तरांच्या अध्यापनपटुत्वाचा एक घडण करणारी शक्ती असाच उल्लेख केला पाहिजे. गेली काही वर्षे त्यांच्याकडे मुंबईतले एक प्रसिध्द गायनशिक्षक श्री. बापूराव दातार हेही शिक्षण घेत असतात.

मास्तर हे माझे गुरु व्हावयाच्या आधीपासून ते माझे मावसे आहेत. आमच्या मावशीला त्यांनी गायनातली वाट दाखवली तर तिने मास्तरांना नेहमीच्या व्यवहारात वाट दाखवली. यात कोणीही, कधीही कुरकुर केली नाही. या मोठेपणात तुलना कोणी करावी? मावशीचे घर हे सर्वांचे माहेर व मास्तरांचे घर म्हणजे सर्व घराण्यांचे माहेर असा प्रकार! मास्तरांनी गायन हा संसार मानला. आणि मावशीने आपला संसार ही गायनसेवा (कोटी करायचीच तर गानूसेवा!) मानली. गेल्या रविवारी मास्तरांच्या एकसष्टीनिमित्त झालेल्या सत्कारात या दोघांची तारीफ करण्यात श्री. वामनराव देशपांड्यापासून ते गुरू गजाननराव जोशी यांच्यापर्यंत सर्वांनीच चढता सूर लावला. या सर्वांचा अर्थ एकच होता, की बाजूला राहून माणूस मोठा असू शकतो याची आत असणाऱ्यांना जाणीव असते.

---